वादीतर्फे साक्षीदार क्र.४

माझे नाव : योगेश देवरावजी विरकर
वय : ३९ वर्षे, कामधंदा : नोकरी
रा.अमरावती, ता.जि. अमरावती.

वादीचे विद्वान वकील श्री.यु.जानोरकार वकीलांमार्फत सरतपासणी शपथेवर सुरू.

१. मी माहे ऑगस्ट–२००५ पासून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ येथे कनिष्ठ साठा अधिक्षक पदावर कार्यरत आहे. आमच्या वेअर हाउसमध्ये चांगल्या प्रतिचा उडीद ठेवल्यास वर्षभरात त्यात तीन टक्यांची घट होते. तसेच, दोन ते तीन वर्षात उडीदाची अंदाजे पाच टक्यांपर्यंत घट होते. उडीद दोन ते तीन वर्ष ठेवल्यास मालाच्या गुणवत्तेत निश्चित होणारी घट मी सांगु शकत नाही. साक्षिदार स्वत:हून सांगतो की, अंदाजे १५ टक्केचा घट त्यात होतो.

वादीतर्फे साक्षीदार क्र.४ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे ॲड. श्री.पी.एम. राठी वकिलांमार्फत शपथेवर सुरू.

१. माझे शिक्षण पदव्युत्तरपर्यंत व संगणकाचे प्रशिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, उडीदाचा घट सांगण्याकरीता लागणारी कोणतीही पदवी मी घेतलेली नाही. मी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ मध्ये नोकरीवर कार्यरत असल्याबाबतचा कोणताही दस्त मी अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील कोणताही माल हा महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ येथे ठेवण्यात आला नव्हता. माझ्या सरतपासात उडीदाच्या घटाबाबत सांगीतलेली टक्केवारी ही केवळ अंदाजीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, उडीदाचा घट हा मालाच्या गुणवत्तेवर ठरतो. हे म्हणणे खरे आहे की, वेअर हाउसमध्ये ठेवण्यात आलेले कोणतेही कडधान्य याची गुणवत्ता कमी दर्जाची असल्यास त्यात घट जास्त प्रमाणात होतो. हे म्हणणे खरे आहे की,

2-4/06/26.

प्रस्तुत प्रकरणातील उडीद मालाच्या गुणवत्तेबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील उडीद मालाच्या घट बाबत मी निश्चित सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, उडीद व मुंग यांची इतर कडधान्यापेक्षा लवकर व जास्त प्रमाणात घट होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझ्या परीचयाचे आहे. मी खामगांव येथे कार्यरत असतांना वादीने त्याचा माल गेल्या सहा महिण्यात आमच्या वेअर हाउसमध्ये ठेवला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात उडीद मालाच्या गुणवत्तेबाबत व घटबाबत वादीचे सांगण्यावरून व वादीस मदत व्हावी या उद्देशाने चुकीची माहिती दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.
फेरतपास काहीही नाही.

समक्ष

24/06/26.

दिनांक: २४.०६.२०२६
ठिकाण: अकोला

(व्ही. व्ही. जोशी)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.